जा.क्र.उमाशि-१/११वी प्रवेश/पुवि/२०१४-१५/ १४५९५/९८
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दि. 20 JUN 2014

प्रति,

सर्व झोन प्रमुख
इ.११ वी केंद्रिय प्रवेश प्रक्रिया, पुणे
पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र

**विषय :- सन २०१४-१५ इयत्ता ११ वी ऑनलाईन केंद्रिय प्रवेश प्रक्रिया.**
**तक्रार निवारणाबाबत...**

सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील इ.११ वी वर्गातील प्रवेश केंद्रिय प्रवेश समितीमार्फत ऑनलाईन पध्दतीने निश्चित केले जात आहेत, हे आपणास विदीत आहेच. सदर प्रवेश प्रक्रिया सुलभ व सुटसुटीत होण्यासाठी व गरजू विद्यार्थ्यांना प्रत्येक स्तरावर योग्य व अचूक मार्गदर्शन मिळण्यासाठी केंद्रिय प्रवेश समितीने एकुण कार्यक्षेत्राची नऊ झोनमध्ये विभागणी केलेली आहे. प्रत्येक झोनसाठी झोनप्रमुख, सहाय्यक झोनप्रमुख, पर्यवेक्षकिय अधिकारी तसेच मार्गदर्शन केंद्रप्रमुख यांची नियुक्ती केलेली आहे. त्यानुसार आपली झोनप्रमुख म्हणून नियुक्ती केलेली असून प्रवेश प्रक्रियेबाबत आपण विद्यार्थ्यांकडून आलेल्या तक्रारींचे निराकरण झोनस्तरावरून करावयाचे आहे.

सदर प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रवेश अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणत्याही स्तरावर काही शंका / अडचणी येऊ शकतात. माहिती पुस्तिकेमध्ये आपले भ्रमणध्वनी क्रमांक दिलेले असल्यामुळे असे विद्यार्थी आपणास दुरध्वनीद्वारे संपर्क करतील. अशा विद्यार्थ्यांना केंद्रिय प्रवेश समितीने तयार केलेल्या माहितीपुस्तिकेच्या नियमावलीच्या आधारे व्यवस्थित उत्तरे दयावीत. काही विद्यार्थी आपणास वैयक्तिकरित्या भेट देतील. अशा विद्यार्थ्यांच्या तक्रारी लेखी स्वरूपात घेऊन रजिस्टरमध्ये नोंद करून त्यांच्या तक्रारींचे निराकरण करावे. ज्या तक्रारींचे निराकरण झोनस्तरावरून होत नसल्यास व तक्रारींमध्ये सुकृतदर्शनी तथ्य असल्यास अशा तक्रारी शिक्षणउपसंचालक कार्यालयाकडे श्री बाळासाहेब ओव्हाळ, सहाय्यक शिक्षण संचालक, पुणे विभाग, पुणे तथा सचिव, केंद्रिय प्रवेश समिती, पुणे यांचेकडे पाठवाव्यात.

तसेच आपल्या अधिनस्त असलेल्या आपल्या झोनमधील ज्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयामध्ये अल्पसंख्यांक, इनहाऊस कोटा व व्यवस्थापन कोटा यामधील जागा केंद्रिय प्रवेश समितीला प्रत्यार्पित (Surrender) करावयाच्या असतील तर संगणक एजन्सीने एक लिंक दिलेली आहे त्या लिंकवर शाळेने / कनिष्ठ महाविद्यालयाने जागा कळविणेबाबतची कार्यवाही दि.२३.०६.२०१४ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यत करावी.

आपल्या झोनमधील अल्पसंख्यांक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये तसेच इनहाऊस कोटा प्रवेश क्षमता यांची यादी तयार करून सदर शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये भरण्यात आलेल्या जागा व रिक्त जागांबाबत माहिती वेळोवेळी संगणक एजन्सीकडे अद्यावत करते किंवा नाही याची संगणकतज्ञ श्री संदिप चिपळूणकर यांच्याशी चर्चा करून खात्री करावी. ज्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी जागांबाबत माहिती अद्यावत करत नाहीत, त्यांच्याशी आपण त्वरीत संपर्क साधून माहिती अद्यावत करून घ्यावी. **झोनमधील सर्व कामांचे संनियंत्रण पर्यवेक्षीय अधिकारी यांनी करावयाचे आहे.**

२०/६/१४

**(सुमन शिंदे)**
**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग, पुणे-१ तथा**
**अध्यक्ष**
**इ.११वी केंद्रिय प्रवेश समिती, पुणे**

**प्रत माहितीस्तव सादर :-**

१. मा.शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना :-**

१. श्री संदिप चिपळूणकर, समन्वयक, एमकेसीएल, पुणे
२. सर्व पर्यवेक्षकिय अधिकारी, केंद्रिय प्रवेश समिती, पुणे